# "जंक्शन डिझाईन" स्पर्धेला 27 जानेवारीपर्यंत मुदतवाढ

**नागपूर, ता. 20:** शहरातील निवडक 5 चौकांचे सौंदर्यीकरण घडवून आणण्याचा उद्देशाने मनपातर्फे आयोजित जंक्शन डिझाईन स्पर्धेत सहभागासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

कडबी चौक, उंटखाना चौक, संविधान चौक, व्हेरायटी चौक व पागलखाना चौक या चौकांसाठी ही स्पर्धा घेण्यात येत आहे. स्पर्धकांना 27 जानेवारी 2017 दुपारी 2 पर्यंत त्यांच्या संकल्पना पावर पॉइंट फाईल व पीडीएफ तसेच 'हाय रिझॉल्युशन एडिटेबल डिजीटल'(High resolution editable digital) रुपात सादर करावी लागेल. स्पर्धेच्या निकालाचा दिनांक मनपाच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

30 ते 50 लाख रुपये खर्च या मर्यादेतील डिझाईन स्पर्धक सादर करू शकतील. स्पर्धक हा नागपूरचा रहिवासी असणे गरजेचे आहे. व्यक्ती अथवा चमू हे स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. स्पर्धकांनी आय.आर.सी.(IRC), रोड डिझाईन कोड (Road design code), स्ट्रीट डिझाईन गाईड लाईन्स (Street design guide lines) मधील निकषानुसार डिझाईन तयार करणे अपेक्षित आहे.

## प्रस्ताव सादर करण्याचे ठिकाण

स्पर्धकांना अतिरिक्त उपायुक्त (2) यांचा कक्ष, पालिका मुख्यालय येथे आपला प्रस्ताव सादर करता येईल. ही स्पर्धा गुणांकन पद्धतीने होणार असून एकूण 100 गुणांची असेल.

विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या डिझाईन्सचाच विचार केला जाईल. निवडलेले डिझाईन मनपाच्या मालकीचे राहील. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. प्रत्येक चौकासाठी परीक्षकांनी निवडलेल्या डिझाईनला 1 लाख रुपये पारितोषिक प्रदान केले जातील. स्पर्धेत मोठया प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी केले आहे.